मंत्रालयीन सेवा

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग
३ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्रमांक : (०२२) २२०६०१४४

**Website** : www.rdd.maharashtra.gov.in **Email** : soest3a.rdd-mh@nic.in

---

क्र.RDD-76019/16/2025-RDD-(EST-5A)) दिनांक : १८ सप्टेंबर, २०२५.

प्रति,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषदा, सर्व.

२. अपर आयुक्त (आस्थापना),
विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व विभाग.

**विषय:** सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम गुणांकनाबाबत सर्वसाधारण सूचना

**संदर्भ:** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाचे क्र.एसआरव्ही-२०२५/ प्र.क्र.२७/का.१२ (सेवा), दिनांक ०९ जून, २०२५.
२) ग्राम विकास विभागाचे पत्र क्र.RDD-१४०११/४४/२०२५-RDD (EST-३A), दिनांक २४ जुलै, २०२५.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभागाचे क्र.एसआरव्ही-२०२५/ प्र.क्र.२७/का.१२ (सेवा), दिनांक १६ सप्टेंबर, २०२५.

महोदय,

सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमाबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांच्या गुणांकनाबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत (प्रत संलग्न).

२.१ सदर कार्यक्रमांतर्गत स्वत: प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, इ. संस्थांचा आढावा घेऊन शासन निर्णय दि.९.६.२०२५ मधील विवरणपत्र ३ नुसार ९ मुद्यांच्या अनुषंगाने १०० गुणांकरिता गुणांकन व वर्गवारी आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर जाहिर करावयाची आहे.

२.२ सेवाकर्मी + कार्यक्रम च्या संदर्भात विवरणपत्र-३ मधील मुद्दा क्र.९ मध्ये सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करणे व डिजीटल करणे याऐवजी सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करणे असा सुधारित करण्यात आला आहे.

२.३ सदर गुणांकनाची माहिती संकलिक करण्यासाठी QCI (Quality Council of India) या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे.

२.४ प्रशासकीय विभागांनी सेवाकर्मी + कार्यक्रम अंतर्गत गुणांकनाबाबतची माहिती परिशिष्ट-इ मध्ये

नमूद करून QCI (Quality Council of India) या संस्थेस दि.२५.९.२०२५ पर्यंत द्यावी.

२.५ प्रशासकीय विभागांनी सेवाकर्मी + कार्यक्रम अंतर्गत ग्राम विकास विभागाने जिल्हा परिषद, ठाणे या स्थानिक स्वराज्य संस्थेचे परिशिष्ट-इ मधील गुणांकनाचे उदाहरण विचारात घेऊन विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयाचे गुणांकन करावे.

२.६ QCI संस्थेमार्फत प्रशासकीय विभागांनी सेवाकर्मी + कार्यक्रम अंतर्गत अधिनस्त संस्थांच्या केलेल्या गुणांकन माहितीच्या **खरेपणाबाबत नमुना तपासणी** (Random checking) करण्यात येईल.

०२. सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने, प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ जुलै, २०२५ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर आढावा बैठकीमध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ९ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील विवरणपत्र-३ नुसार गुणांकन करण्यासाठी संबंधित विवरणपत्रे तयार करून बैठकीमध्ये देण्यात आली होती. तसेच सदर माहिती एकत्रित संकलित करण्यासाठी संबंधित जिल्हा परिषदांची Google Sheet मध्ये माहिती भरून अद्ययावत करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार संबंधित जिल्हा परिषदांनी सदर Google Sheet मध्ये माहिती भरलेली आहे.

०३. ग्राम विकास विभागांतर्गत सर्व ३४ जिल्हा परिषदांची गुणांकनाबाबतची माहिती परिशिष्ट-इ मध्ये नमूद करून QCI (Quality Council of India) या संस्थेस दि.२५.९.२०२५ पर्यंत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सबब, सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदांना गुणांकन करण्यासाठी ग्राम विकास विभागाने पाठविलेल्या Google Sheet मध्ये माहिती अद्ययावत करून सदर माहितीची संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेली प्रत संबंधित अपर आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय यांना सादर करावी. अपर आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व जिल्हा परिषदांची सदर प्रमाणित माहिती एकत्रित करून शासनास दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ पर्यंत सादर करावी, ही विनंती. तसेच सर्व जिल्हा परिषदांच्या संकेतस्थळाची (Website) माहिती उपलब्ध करून द्यावी व सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त शासन परिपत्रकासोबतच्या तक्ता-२ नुसार सबंधित जिल्हा परिषदांच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध करण्याची दक्षता घ्यावी. सदर कार्यवाही १५० दिवस कार्यक्रमाशी संबंधित असून उर्वरित कालमर्यादा विचारात घेता सर्वप्राथम्याने करण्याची विनंती आहे.

आपला,

(सुभाष इंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र: वरीलप्रमाणे.

प्रत,

१. उप सचिव (सर्व), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. निवड नस्ती, कार्यासन आस्था-५ अ, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने
१५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम-
गुणांकनाबाबत सर्वसाधारण सूचना

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.२७/का.१२(सेवा)**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.

तारीख: १६ सप्टेंबर, २०२५

संदर्भ.

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०२५/ प्र.क्र.२७/ का.१२ (सेवा), दिनांक ९ जून, २०२५.

२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीएफआर-१२२४/ प्र.क्र.१६४/ आस्थामं(१३), दिनांक १९ जून २०२५.

३. शासन शुद्धिपत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०२५/ प्र.क्र.२७/ मआस्था, दिनांक २० जून, २०२५

४. शासन शुद्धिपत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीएफआर १२२४/ प्र.क्र.१६४/आस्थामं, दिनांक २२ जुलै २०२५.

५. शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग पत्र क्रमांक एसआरव्ही २०२५/प्र.क्र. २७/का.१२ दि. २२ जुलै, २०२५.

६. शासन शुद्धिपत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०२५/ प्र.क्र.२७/ का.१२(सेवा), दिनांक २० ऑगस्ट, २०२५

७. शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग पत्र क्रमांक एसआरव्ही २०२५/प्र.क्र. २७/का.१२ दि. ४ सप्टेंबर, २०२५ रोजीचे पत्र.

शासन परिपत्रक.

पारदर्शक, गतिमान सुप्रशासनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक प्रगतीचे मूल्यांकन करण्याकरिता गुणांकनाबाबत १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्यास संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. उक्त कार्यक्रमाचे स्वरूप वरील शासन निर्णयात निर्दिष्ट केल्याप्रमाणे आहे.

२. उक्त कार्यक्रमांतर्गत अंतिम गुणांकन दि.२ ऑक्टोबर, २०२५ रोजी घोषित करण्यात येणार आहे. या गुणांकनाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

## १) ४३ मंत्रालयीन सचिवांचे सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येणारे गुणांकन

१.१ सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत ४३ मंत्रालयीन सचिवांचे सेवा विषयक बाबींच्या ८ मुद्द्यांच्या अनुषंगाने १०० गुणांचे प्राथमिक गुणांकन दि. १ मे, २०२५ रोजी घोषित करण्यात आले आहे. तसेच गुणांकनानुसार खालीलप्रमाणे वर्गवारी घोषित करण्यात आली आहे.

| अ.क्र | मुद्दा | वर्गवारी |
|---|---|---|
| १ | ७५ पेक्षा जास्त गुण मिळवणारे विभाग | विशेष प्रशंसनीय |
| २ | ६० पेक्षा जास्त गुण मिळवणारे विभाग | प्रशंसनीय |
| ३ | ४० ते ६० या दरम्यान गुण मिळवणारे विभाग | प्रगतशील |
| ४ | ४० पेक्षा कमी गुण मिळवणारे विभाग | प्रयत्नशील |

- आता या ८ मुद्यांच्या अनुषंगाने विभागाने प्रगती केली असल्यास दि.१५ सप्टेंबर, २०२५ च्या प्रगतीनुसार अद्ययावत माहिती साप्रविस सादर करावी. त्यानुसार विभागाच्या सचिवांचे गुणांकन सुधारित करण्यात येईल. सदर अद्ययावत माहिती साप्रविस प्राप्त न झाल्यास संबंधित सचिवांचे दि. १ मे, २०२५ रोजीचे गुणांकन अंतिम राहील याची नोंद घ्यावी.
- **सुधारित आकृतिबंध :-** सेवाकर्मी कार्यक्रमाच्या सदर टप्प्याची सुधारित माहिती सादर करताना संदर्भाधीन क्र.६च्या दि.२०.०८.२०२५ च्या शासन शुद्धिपत्रान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आकृतिबंध या घटकाच्या गुणांकन निकषांत करण्यात आलेल्या सुधारणा विचारात घेण्यात याव्यात.
- सदर माहिती सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** अनुसार सादर करावी.

### १.२ सेवाकर्मी टेक

- सेवाकर्मी टेक अंतर्गत ४३ मंत्रालयीन सचिवांचे ४ मुद्द्यांच्या अनुषंगाने १०० गुणांचे गुणांकन करण्यात येणार आहे. सदर गुणांकन सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट ब"** अनुसार साप्रविकडून करण्यात येणार आहे.
- सेवाकर्मी टेक अंतर्गत ४ मुद्यांपैकी मुद्दा क्र. ४ मध्ये सुधारणा करण्यात आली असून नव्याने विहित करण्यात आलेल्या बाबी **"परिशिष्ट-ड"** अनुसार राहतील.

१.३ वर स्पष्ट केल्याप्रमाणे सेवाकर्मी टप्प्यामधील ८ मुद्द्यांचे सुधारित १०० गुण व सेवाकर्मी टेक टप्प्यामधील ४ मुद्याचे १०० गुण अशा एकूण २०० गुणांचे ४३ मंत्रालयीन सचिवांचे अंतिम गुणांकन १५ सप्टेंबरच्या प्रगतीनुसार दि.२ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर करण्यात येईल

## २) सेवाकर्मी + कार्यक्रम

**(प्रशासकीय विभागांच्या अधीनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम, आयोग इ.)**

२.१ सदर कार्यक्रमांतर्गत स्वत: प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधीनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम, आयोग इ. संस्थांचा आढावा घेऊन शासन निर्णय दि.९.६.२०२५ मधील विवरणपत्र ३ नुसार ९ मुद्दयांच्या अनुषंगाने १०० गुणांकरिता गुणांकन व वर्गवारी आपल्या विभागाच्या संकेतस्ळाळावर जाहीर करावयाची आहे.

२.२ सेवाकर्मी + कार्यक्रम च्या संदर्भात विवरणपत्र-३ मधील मुद्दा क्र. ९ मध्ये **सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करणे व डिजीटल करणे** याऐवजी **सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करणे** असा सुधारीत करण्यात आला आहे.

२.३ सदर गुणांकनाची माहिती संकलित करण्यासाठी QCI ( Quality Council of India ) या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे.

२.४ प्रशासकीय विभागांनी सेवाकर्मी+ कार्यक्रम अंतर्गत गुणांकनाबाबतची माहिती सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-इ** मध्ये नमूद करुन QCI ( Quality Council of India ) या संस्थेस दि. २५.०९.२०२५ पर्यंत द्यावी.

२.५ प्रशासकीय विभागांनी सेवाकर्मी+ कार्यक्रम अंतर्गत ग्राम विकास विभागाने जिल्हा परिषद, ठाणे या स्थानिक स्वराज्य संस्थेचे सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-इ** मधील गुणांकनाचे उदाहरण विचारात घेऊन आपल्या विभागाच्या अधीनस्त क्षेत्रीय कार्यालयांचे गुणांकन करावे.

२.६ QCI संस्थेमार्फत प्रशासकिय विभागांनी सेवाकर्मी+ कार्यक्रम अंतर्गत अधिनस्त संस्थांच्या केलेल्या गुणांकन माहितीच्या खरेपणाबाबत नमुना तपासणी (random checking) करण्यात येईल.

३. प्रशासकीय विभागांनी उपरोक्त सूचना विचारात घेऊन सेवाकर्मी कार्यक्रमाच्या गुणांकनाच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

४. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२५०९१६१९२४०९३८०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: CN = LEENA ASHISH SANKHE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2025.09.16 19:39:39 +05'30'

(लिना संखे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सहपत्रे - परिशिष्ट “अ” ते “इ”

प्रत माहितीस्तव-

१) मा .राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उपमुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६) सर्व मा. संसद सदस्य/विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र.
७) मामुख्य सचिव ., महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव-**

१) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील सर्व आयुक्तालये, संचालनालये, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्वायत्त संस्था, आयोग, अभिकरणे, कंपन्या. इत्यादी.
३) सर्व विभागीय आयुक्त.
४) सर्व जिल्हाधिकारी.
५) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
६) सर्व नगरपरिषद/नगरपंचायत यांचे मुख्याधिकारी.
७) सर्व पोलीस आयुक्त.
८) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.
९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१०) सर्व सहसचिव/उपसचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (सेवा), मंत्रालय, मुंबई.
११) निवड नस्ती, कार्यासन सेवा (का.१२).

# परिशिष्ट अ

## सेवाकर्मी कार्यक्रम

## टप्पा-१ गुणांकन

## ४३ मंत्रालयीन सचिवांचे सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येणारे गुणांकन

## सेवा विषयक आढावा- ---------------------- विभाग

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>मुद्दा</th><th>तपशील</th><th>गुण</th></tr>
<tr><td>१</td><td>आकृतिबंध</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>आस्थापनांचे नाव</th><th>संवर्ग</th><th>आकृतिबंध शासन निर्णय दिनांक</th></tr>
<tr><td>१.</td><td></td><td>गट-अ<br>ते<br>गट-ड</td><td></td></tr>
<tr><td>२.</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>३.</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>४.</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>५.</td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td><td>गुण<br>--/१५<br>(सचिवांच्या अधीनस्त एकूण--- आस्थापनांपैकी-इतक्या आस्थापनांचा आकृतीबंध अद्ययावत असून ही टक्केवारी ----एवढी आहे.)</td></tr>
<tr><td>२</td><td>सेवाप्रवेश नियम</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>विभागाच्या अधीनस्त एकूण संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>मृत संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>इतर विभागाचे (सा.प्र.वि/वित्त) सेवा प्रवेश नियम असलेले संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>उर्वरित संवर्ग [१-(२+३)]</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td>उर्वरित संवर्गापैकी दि.९.९.२०२१ नंतर सेवा प्रवेश नियम प्रसिध्द केलेले संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>उर्वरित संवर्गापैकी दि.९.९.२०२१ पूर्वी सेवा प्रवेश नियम प्रसिध्द केलेले संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>टक्केवारी (५/४*१००)</td><td></td></tr>
</table>
</td><td>--/१५<br>(सचिवांच्या अधीनस्त एकूण ---संवर्गापैकी ---इतक्या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम अद्ययावत झाले असून त्याची टक्केवारी--- एवढी आहे.)</td></tr>
<tr><td>३</td><td>पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती</td><td>
(१) पदोन्नतीतील रिक्त पदांचे प्रमाण (गट अ व ब)
<table>
<tr><th>तपशील</th><th>पदोन्नती कोटा</th><th>सरळसेवा कोटा</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>मंजूर पदे</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>कार्यरत पदे</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>रिक्त पदे</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>रिक्त पदांचे प्रमाण %</td><td>%</td><td>%</td><td>%</td></tr>
</table>
</td><td>--/५<br>(पदोन्नती कोटयातील रिक्त पदांचे प्रमाण ----टक्के)</td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>मुद्दा</th><th>तपशील</th><th>गुण</th></tr>
<tr><td></td><td></td><td>(२) ज्येष्ठतासूची अद्यावत (गट अ व गट ब)<br>
<table>
<tr><td>१</td><td>विभागाच्या अधीनस्त एकूण संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>एकूण संवर्गापैकी एकाकी संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>जेष्ठतासूची प्रसिद्ध करणे आवश्यक संवर्ग [१-२]</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>३ मध्ये नमूद संवर्गापैकी जेष्ठता सूची अद्ययावत केलेले संवर्ग (दि.१.१.२०२४)</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td>टक्केवारी (४/३%)</td><td>%</td></tr>
</table></td><td>--/५<br>(ज्येष्ठतासूच्या अद्ययावत असलेले संवर्ग प्रमाण ---%)</td></tr>
<tr><td></td><td></td><td>(३) पदोन्नतीच्या निवडसूच्या अद्ययावत (गट अ व गट ब)<br>
<table>
<tr><td>१</td><td>विभागाच्या अधीनस्त पदोन्नतीचे एकूण संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>पदोन्नतीच्या संवर्गापैकी पात्र उमेदवार उपलब्ध नसणारे संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>पदोन्नतीच्या संवर्गापैकी न्यायालयीन प्रक्रीयेमुळे स्थगिती असलेले संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>पदोन्नतीच्या निवडसूच्या अद्ययावत करणे आवश्यक संवर्ग [१-(२+३)]</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td>निवडसूच्या अद्ययावत असलेले संवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>टक्केवारी ( ५/४%)</td><td>%</td></tr>
</table></td><td>--/५<br>(पदोन्नतीच्या २०२४-२५ निवडसूच्या अद्ययावत प्रमाण -- टक्के)</td></tr>
<tr><td>४</td><td>सरळसेवेने नियुक्तीची स्थिती</td><td>(१)सरळसेवेच्या रिक्त पदांचे प्रमाण (गट अ व ब)<br>
<table>
<tr><th>तपशील</th><th>पदोन्नती कोटा</th><th>सरळसेवा कोटा</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>मंजूर पदे</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>कार्यरत पदे</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>रिक्त पदे</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>रिक्त पदांचे प्रमाण %</td><td>%</td><td>%</td><td>%</td></tr>
</table></td><td>--/५<br>(सरळसेवा कोटयातील रिक्त पदांचे प्रमाण -- टक्के)</td></tr>
<tr><td></td><td></td><td>(२) सरळसेवा मागणीपत्र पाठविल्याचे प्रमाण (गट अ व ब)<br>
<table>
<tr><th>सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे</th><th>मागणीपत्र पाठवलेली पदे</th><th>टक्केवारी</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
</table></td><td>--/५<br>(सरळसेवा कोटयातील रिक्त पदांसाठी मागणीपत्राचे प्रमाण -- टक्के)</td></tr>
<tr><td></td><td></td><td>(३) शिफारस प्राप्त झालेल्या एकूण --- पदापैकी ------ एवढ्या उमेदवारास नियुक्ती देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे .</td><td>/५<br>(नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांचे प्रमाण ---- %)</td></tr>
<tr><td>५</td><td>अनुकंपा नियुक्ती</td><td>
<table>
<tr><th>एकूण उपलब्ध पदे</th><th>उपलब्ध पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांची संख्या</th><th>टक्केवारी</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
</table></td><td>/१०<br>(नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांचे प्रमाण ---- %)</td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>मुद्दा</th><th>तपशील</th><th>गुण</th></tr>
<tr><td>६</td><td>गोपनीय अहवाल</td><td><table>
<tr><td></td><td></td><td>महापार प्रणालीनुसार माहिती</td></tr>
<tr><td></td><td>अधीनस्त सचिवांच्या अस्थापानातील गट-अ व गट-ब अधिकारी संख्या</td><td></td></tr>
<tr><td>६(१)</td><td>त्यापैकी महापारप्रणालीवर नोंदणी झालेल्या अधिका-यांची संख्या</td><td>०</td></tr>
<tr><td>६(२)</td><td>त्यापैकी PAR कार्यवाही पूर्ण झालेली संख्या</td><td>०</td></tr>
</table></td><td>--/५<br>(गट-अ, गट-ब संवर्गातील महापार प्रणालीत समावेश करण्यात आलेल्या अधिका-यांचे प्रमाण ----- %)<br><br>--/५<br>(सन २०२३-२४ यावर्षात आत्तापर्यंत PAR वरील कार्यवाही पूर्ण झालेले प्रमाण --- %)</td></tr>
<tr><td>७</td><td>iGOT</td><td><table>
<tr><td>एकूण कार्यरत अधिकारी</td><td>रजिस्ट्रेशन झालेले</td><td>टक्केवारी</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
</table></td><td>---/१०<br>(iGOT रजिस्ट्रेशन झालेले अधिकारी ---टक्के)</td></tr>
<tr><td rowspan="2">८</td><td rowspan="2">विभागीय चौकशी</td><td>(१) DE पोर्टलवर माहिती अद्ययावत आहे काय? (होय/नाही)</td><td>--- /५</td></tr>
<tr><td>(२) निलंबन आढावा पूर्ण झालेल्या कार्यवाहीची कार्यवाहीची टक्केवारी</td><td>----/५</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">एकूण गुण</td><td>----/१००</td></tr>
</table>

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: CN = LEENA ASHISH SANKHE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2025.09.16 19:39:56 +05'30'

# परिशिष्ट-ब

## सेवाकर्मी टेक

## टप्पा-२ गुणांकन

## मंत्रालयीन ४३ सचिवांचे गुणांकन

## (सचिवांच्या अधीनस्त शासकीय कर्मचारी असलेल्या आस्थापनांच्या सेवा विषयक बाबींसंदर्भात मुद्द्यांचे गुणांकन)

## (शा.नि., सा.प्र. विभाग, दि.०९.०६.२०२५ सोबतचे विवरणपत्र-२ अनुसार)

| | मुद्दे | स्पष्टीकरण | गुणांकन करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | विभागातील गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड संवर्गातील पदोन्नती ( गुण २० ) | साप्रविच्या शा. नि. दि. ०४.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार सोबतच्या **परिशिष्ट क** मध्ये साप्रवि /सेवा (१२) कार्यासनास संबंधित विभागाने एकत्रित माहिती सादर करावी. | साप्रवि /सेवा (१२) |
| २ | गोपनीय अहवाल (महापार) गट-अ, गट-ब संवर्गातील मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल digitise करुन महापार प्रणालीवर Upload करणे **(गुण २०)** | साप्रविच्या शा. नि. दि. १९.०६.२०२५ व शुद्धिपत्र दि. २२.०६.२०२५ अनुसार महापार पोर्टल वरील गोपनीय अहवालाच्या माहितीनुसार साप्रविकडून गुणांकन करण्यात येईल. | साप्रवि/आस्थामं कार्यासन |
| ३ | iGOT पोर्टलवर कर्मचारी निहाय ५ प्रशिक्षण कोर्स पूर्ण केल्याचे प्रमाण ( गुण १० ) | iGOT पोर्टलवर प्रशिक्षण कोर्सच्या पूर्ततेबाबत पोर्टलवरील माहितीनुसार साप्रविकडून गुणांकन करण्यात येईल. | साप्रवि/प्रशिक्षण कार्यासन |
| ४ | सेवा विषयक बाबींच्या डिजिटल पोर्टलवर सेवापुस्तक अद्ययावत करणे व ऑनबोर्डींग करणे ( गुण ५० ). | सदर मुद्द्यांचे गुणांकन सुधारीत केले असून ते प्रत्येक मंत्रालयीन विभागाकरिता सोबतच्या **परिशिष्ट ड** मध्ये सुधारित केल्यानुसार नमूद बाबीप्रमाणे साप्रविकडून करण्यात येईल. | साप्रवि/महाआस्था कार्यासन |
| **एकूण गुण** | | १०० | |

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: CN = LEENA ASHISH SANKHE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2025.09.16 18:43:18 +05'30'

# परिशिष्ट —क

## (सेवाकर्मी टेक- मुद्दा क्र.१ - पदोन्नतीबाबत संकेतस्थळावर जाहीर करावयाचा तपशील)

## (शासन निर्णय, सा. प्र. विभाग, दि.०९.०६.२०२५ याचे विवरणपत्र २ यामधील मुद्दा क्र. १)

| सन २०२४-२५ निवडसूचीवर्षात पदोन्नती कार्यवाही (गट-अ ते गट-ड संवर्ग) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | संवर्गाचे नाव | संवर्गात एकूण मंजूर पदे | सरळसेवा: पदोन्नती कोट्याचे प्रमाण | सरळसेवेच्या कोट्यातील पदे | | पदोन्नतीच्या कोट्यांतील पदे | | अद्ययावत जेष्ठता सूची प्रसिद्ध केल्याचा दिनांक | पदोन्नतीची कार्यवाही नजिकच्या (Recently) कोणत्या निवड सूची वर्षात करण्यात आली आहे. | सन २०२४-२५ च्या निवडसूचीची सध्याची स्थिती | रिक्त पदांपैकी किती पदांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. | रिक्त पदांपैकी किती पदांचे पदोन्नतीचे आदेश अद्याप प्रलंबित आहेत, *अशा पदांची पदोन्नती प्रक्रिया कोणत्या टप्प्यावर प्रलंबित आहे व त्याची कारणे |
| | | | | भरलेली पदे | रिक्त पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

***टीप** : एखाद्या संवर्गात खालील कारणामुळे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करता येत नसतील तर त्या पदांना पदोन्नती स्थितीबाबत टक्केवारीची गणना करतांना वगळण्यात येईल.

- न्यायालायीन प्रकरणामुळे पदोन्नती देता नाही.
- निम्न संवर्गात पात्र उमेदवार उपलब्ध नाहीत.
- पद खुले ठेवण्यात आले असल्यामुळे पदोन्नतीचे पद रिक्त आहे.
- दिव्यांग अधिकारी/कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे त्याप्रवर्गाचे पद रिक्त ठेवण्यात आले आहे.

त्यामुळे याबाबत विगतवारी नमूद करावी.

निवडसूची वर्ष २०२४-२५ करिता उपरोक्त प्रमाणे प्रत्येक विभागाने सामान्य प्रशासन विभागास कळविलेली संवर्गनिहाय पदोन्नतीची दिनांक ३० ऑगस्ट, २०२५ रोजीची स्थिती संबंधित विभागाच्या व सामान्य प्रशासन विभागाच्या संकेतस्थळावर **वरील परिशिष्ट क** अनुसार प्रसिद्ध करण्यात येईल.

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: CN = LEENA ASHISH SANKHE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2025.09.16 19:43:28 +05'30'

# परिशिष्ट – ड

## (सेवाकर्मी टेक अंतर्गत मुद्दा क्र. ४)

## सेवा विषयक बाबींच्या डिजिटल पोर्टलवर सेवापुस्तक अद्ययावत करणे व ऑनबोर्डींग करणे या मुद्द्यांचे सुधारित गुणांकनाचे विवरणपत्र

| अ.क्र | उद्दिष्टे | गुणांकन |
|---|---|---|
| १. | शासन परिपत्रक, सा.प्र. विभाग, दिनांक २०.०६.२०२५ यामधील सूचनांनुसार महा-आस्था (eHRMS) कार्यासनाची स्थापना करुन आदेशाची प्रत सामान्य प्रशासन विभागास पाठविणे. | ५ |
| २. | शासन परिपत्रक, सा.प्र. विभाग, दिनांक २०.०६.२०२५ यामधील सूचनांनुसार महा-आस्था (eHRMS) संबंधी संपर्कासाठी महा-आस्था कक्षाचा email ID तयार करणे व त्याबाबत सामान्य प्रशासन विभागास कळविणे. | ५ |
| ३. | शासन परिपत्रक, सा.प्र. विभाग, दिनांक २०.०६.२०२५ यामधील सूचनांनुसार विभागाचा Organogram तयार करणे व त्याची प्रत सामान्य प्रशासन विभागास पाठविणे. | ५ |
| ४. | सामान्य प्रशासन विभागाद्वारे महा-आस्था संदर्भात आयोजीत प्रशिक्षण विभागाच्या नोडल अधिकारी व आहंरण संवितरण अधिकाऱ्यांनी घेतले आहे. | ५ |
| ५. | Data Entry Operator (DEO) यांची नियुक्ती करणे व त्याच्या आदेशाची प्रत सामान्य प्रशासन विभागास पाठविणे. (सामान्य प्रशासन विभाग, मआस्था यांचेमार्फत निर्गमित पत्र दिनांक २६.०८.२०२५ मधील तरतुदीनुसार प्रशासकीय विभागातील प्रत्येक ३० कर्मचाऱ्यांमागे १ DEO ची नियुक्ती करणे) | ५ |
| ६. | बदली, पदोन्नती, प्रतिनियुक्ती इत्यादी कारणांमुळे अन्य आस्थापनेमध्ये रुजू झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत करुन संबंधित आस्थापनेस उपलब्ध करुन देणे. | १० |
| ७. | भौतिक सेवापुस्तकातील १ जुलै, २०२५ पर्यंतच्या नोंदी अद्ययावत करणे (शासन परिपत्रक, सा.प्र. विभाग, दिनांक २०.०६.२०२५ यामधील सूचनांनुसार लागू असणारे आदेश व नोंदीसह)<br>८० % व त्यावरील (एकूण कर्मचारी संख्येच्या) – १५<br>६०-८० % – १०<br>५०-६० % – ५<br>५० % खालील – ० | १५ |
| | एकूण – | ५० |

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: CN = LEENA ASHISH SANKHE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2025.09.16 19:43:37 +05'30'

# परिशिष्ट-इ

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

## सेवाकर्मी+ कार्यक्रम

**(संदर्भ :- साप्रवि शासन निर्णय दि. ०९.०६.२०२५ विवरणपत्र-३ अनुसार)**

**QCI ला प्रशासकीय विभागाने उपलब्ध करुन द्यावयाची माहिती**

**स्वत: प्रशासकीय विभागाने आढावा घेऊन करावयाचे गुणांकन**

(प्रशासकीय विभागांच्या अधीनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम, आयोग, इ.)

| तक्ता १ | | |
|---|---|---|
| १. | प्रशासकीय विभागाचे नाव<br>*(उदा. ग्राम विकास विभाग) | |
| २. | सचिवाचे नाव व पदनाम | |
| ३. | सदर प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त सेवाकर्मी + साठी विहित क्षेत्रीय आस्थापनांची संख्या<br>* ( उदा.१ ग्राम विकास विभागाच्या अंतर्गत असलेल्या एकूण स्थानिक स्वराज्य संस्था- जिल्हा परिषदा ३४ इतक्या आहेत त्यामुळे या भागाच्या उत्तरात ३४ ही संख्या नमूद करावी.) | ३४ |
| ४. | क्षेत्रीय आस्थापनांची यादी/संबंधित आस्थापना प्रमुखाचे नाव व पदनामसह<br>*(उदा.ग्राम विकास विभागा अंतर्गत सर्व जिल्हा परिषदांची यादी ) | |

| अ.क्र | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हापरिषद सीईओ चे नाव व पदनाम | जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ व गुणांकन प्रसिद्ध केल्याची Web Link |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा परिषद,पुणे | | |
| २. | जिल्हा परिषद, नागपूर | | |
| ... | | | |
| ... | | | |
| ३४. | जिल्हा परिषद गडचिरोली | | |

<table>
<tr><td colspan="2">तक्ता २</td></tr>
<tr><td colspan="2">वरील तक्ता १ अनुक्रमांक ३ मध्ये अंतर्भुत प्रत्येक क्षेत्रीय आस्थापनानिहाय संकलित करावयाची माहिती</td></tr>
<tr><td>आस्थापनेचे नाव</td><td>जिल्हा परिषद ठाणे</td></tr>
<tr><td>संबंधित आस्थापना प्रमुखाचे नाव व पदनाम</td><td>मुख्य कार्यकारी अधिकारी</td></tr>
<tr><td>आकृतिबंध मंजूर झाल्याचा दिनांक</td><td>दि.२७.०६.२००३</td></tr>
<tr><td>एकूण संवर्ग व मंजूर पदे</td><td>
<table>
<tr><th>गट</th><th>एकूण संवर्ग</th><th>एकूण मंजूर पदसंख्या</th></tr>
<tr><td>गट-अ</td><td>४</td><td>x</td></tr>
<tr><td>गट-ब</td><td>१</td><td>y</td></tr>
<tr><td>गट-क</td><td>४४</td><td>z</td></tr>
<tr><td>गट-ड</td><td>५</td><td>a</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>५४</td><td>x+y+z+a</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>शा.नि., सा.प्र. विभाग, दि. ०९.०६.२०२५ सोबतचे विवरणपत्र ३ अनुसार विभागाच्या संकेतस्थळावर व आस्थापनेच्या संकेतस्थळावर गुणांकन प्रसिद्ध केले आहे काय (संकेतस्थळ/Web Link नमूद करावी)</td><td>होय/नाही<br>https://zpthane.maharashtra.gov.in/</td></tr>
<tr><td>असल्यास एकूण गुण व वर्गवारी</td><td>उदा. ८० गुण (विशेष प्रशंसनीय)</td></tr>
</table>

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: CN = LEENA ASHISH SANKHE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2025.09.16 19:43:49 +05'30'

<u>सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्याबाबत</u>

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.२७/का.१२(सेवा)
मादाम कामा मार्ग, राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: ०९ जून, २०२५

<u>प्रस्तावना :-</u>

राज्य शासनाच्या विविध धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात अधिकारी/ कर्मचारी हे महत्वाची भूमिका पार पाडतात. या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी अद्ययावत असल्यास, अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यास प्रोत्साहन मिळेल, ही बाब विचारात घेता अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक ठरते.

अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी अद्ययावत ठेवण्याच्या प्रगतीचा नियमित आढावा घेऊन, ही प्रगती गुणांकन प्रक्रियेद्वारे मोजल्यास निकोप स्पर्धा वाढीस लागून महत्वाच्या सेवाविषयक बाबी जसे सेवाप्रवेश नियम, आकृतीबंध इत्यादी बाबी अद्ययावत होतील, त्यामुळे पदोन्नती, सरळसेवा/अनुकंपा नियुक्ती इत्यादी बाबी कालबद्ध पद्धतीने पूर्ण होण्यास सहाय्यभूत ठरतील.

हा दूरगामी विचार करुन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमात मंत्रालयीन प्रशासकीय विभागात टप्पा १ व टप्पा २ मध्ये, "सेवाविषयक बाबींच्या गुणांकनाचा सेवाकर्मी कार्यक्रम" राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत शासकीय कर्मचारी कार्यरत असलेल्या ९३ आस्थापनांचे ४७ सचिवनिहाय टप्पा १ प्राथमिक गुणांकन १ मे रोजी निश्चित करुन घोषित करण्यात आले आहे. याच धर्तीवर **प्रत्येक प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरीता १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम** त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम व आयोग यांचे स्तरावर राबविण्याच्या सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

पारदर्शक, गतिमान सुप्रशासनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक प्रगतीचे मूल्यांकन करण्याकरीता गुणांकनाबाबत <u>१५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम</u> **(दिनांक ६ मे, २०२५ ते दिनांक २ ऑक्टोबर, २०२५)** राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील.

**१) ४७ मंत्रालयीन विभागस्तरावरील गुणांकन कार्यक्रम :**

सदर गुणांकन सामान्य प्रशासन विभागामार्फत खालील वेळापत्रकानुसार जाहिर करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १ | १ मे २०२५ | टप्पा-१ प्राथमिक गुणांकन |
| २ | १५ ऑगस्ट २०२५ | टप्पा-२ अंतरिम गुणांकन |
| ३ | २ ऑक्टोबर २०२५ | अंतिम गुणांकन |

गुणांकनात समाविष्ट बाबी खालीलप्रमाणे राहतील.

**अ) टप्पा १:- गुणांकनामध्ये समाविष्ट बाबी (कालमर्यादा दिनांक १ मे, २०२५)**

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **गुण** |
|---|---|---|
| १ | आकृतीबंध | १५ |
| २ | सेवाप्रवेश नियम | १५ |
| ३ | गट-अ व गट- ब संवर्गातील पदोन्नतीने नियुक्ती | १५ |
| ४ | गट-अ व गट- ब सरळसेवा नियुक्ती | १५ |
| ५ | अनुकंपा नियुक्ती | १० |
| ६ | गोपनीय अहवाल (महापार) | १० |
| ७ | iGOT पोर्टलवर रजिस्ट्रेशन | १० |
| ८ | विभागीय चौकशी | १० |
| | **एकूण गुण** | **१००** |

वरील मुद्दा क्र. १ ते ८ मध्ये समाविष्ट तपशीलाबाबत सविस्तर **विवरणपत्र-१** सोबत जोडले आहे.

**आ) टप्पा २: गुणांकनामध्ये समाविष्ट बाबी (कालमर्यादा दिनांक १५ ऑगस्ट, २०२५)**

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **गुण** |
|---|---|---|
| १ | विभागातील गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड संवर्गातील पदोन्नती | २० |
| २ | गोपनीय अहवाल (महापार)<br>गट-अ, गट-ब संवर्गातील मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल digitise करून महापार प्रणालीवर Upload करणे. | २० |

| | | |
|---|---|---|
| ३ | iGOT पोर्टलवर कर्मचारी निहाय ५ प्रशिक्षण कोर्स पूर्ण केल्याचे प्रमाण | १० |
| ४ | सेवा विषयक बाबींच्या डिजिटल पोर्टलवर सेवापुस्तक अद्ययावत करणे व ऑनबोर्डींग करणे. | ५० |
| | **एकूण गुण** | १०० |

वरील मुद्दा क्र.१ ते ४ मध्ये समाविष्ट गुणांच्या तपशीलाबाबत सविस्तर **विवरणपत्र-२** सोबत जोडले आहे.

टप्पा-१ मधील १०० गुणांचे गुणांकन १ मे, २०२५ रोजी जाहीर करण्यात आले आहे. टप्पा-२ अंतर्गत टप्पा-१ मध्ये केलेल्या प्रगतीनुसार सुधारित गुणांकन व टप्पा-२ मधील बाबींचे गुणांकन अशा एकूण २०० गुणांचे विभागाचे गुणांकन दिनांक १५ ऑगस्ट, २०२५ रोजी जाहीर करण्यात येईल.

सेवाकर्मी कार्यक्रमाचे अंतिम गुणांकन १५ सप्टेंबर पर्यंतच्या प्रगतीनुसार २ ऑक्टोबर, २०२५ रोजी जाहीर करण्यात येईल.

**२) मंत्रालयाबाहेरील प्रशासकीय कार्यालयांसाठी राबविण्याचे सेवा विषयक गुणांकन:-**
**(प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम व आयोग इ.)**

सामान्य प्रशासन विभागाने केलेल्या गुणांकनाच्या धर्तीवर प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम, आयोग यातील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबींच्या सुधारणांकरीता त्यांचे स्तरावर गुणांकन कार्यक्रम राबवावा व प्रत्येक कार्यालय/आस्थापनानिहाय गुणांकन विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**अधिनस्त कार्यालये / आस्थापना यांच्या गुणांकनाकरीता समाविष्ट करावयाच्या बाबी**

| अ.क्र. | मुद्दा | गुण |
|---|---|---|
| १ | आकृतीबंध | १० |
| २ | सेवाप्रवेश नियम | १० |
| ३ | सर्व संवर्गाची अद्ययावत जेष्ठतासूची प्रसिद्ध करणे | १० |
| ४ | रिक्त पदी पदोन्नतीने नियुक्तीचे प्रमाण | १० |
| ५ | रिक्त पदी सरळसेवा नियुक्तीचे प्रमाण | १० |

| | | |
|---|---|---|
| ६ | बिंदू नामावली प्रमाणित करून घेणे | १० |
| ७ | अनुकंपा नियुक्ती (गट क व गट ड) | १० |
| ८ | iGOT रजिस्ट्रेशन आणि ५ कोर्स पूर्ण करणे | १० |
| ९ | सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करणे व डिजिटाईझ करणे. | २० |
| | **एकूण गुण** | **१००** |

वरील मुद्दा क्र.१ ते ९ मध्ये समाविष्ट गुणांच्या तपशीलाबाबत सविस्तर **विवरणपत्र-३** सोबत जोडले आहे.

३) १५० दिवसांच्या सेवाकर्मी पुरस्काराच्या कार्यक्रमांतर्गत गुणांकनात सरस ठरुन प्रथम स्थान प्राप्त करणाऱ्या विभागाच्या सचिव व संबंधित आस्थापनांना तसेच प्रत्येक क्षेत्रिय स्तरावर मुद्दा क्र. २ नुसार करण्यात आलेल्या गुणांकनानुसार प्रथम स्थान प्राप्त करणाऱ्या आस्थापना प्रमुखांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०६०९१६४६२९८९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: CN = LEENA ASHISH SANKHE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2025.06.09 16:49:44 +05'30'

**(लिना संखे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत माहितीस्तव
१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खासगी सचिव,
४. सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
६. सर्व मा. संसद सदस्य/ विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७. मा. मुख्य सचिव,

प्रत कार्यवाहीस्तव

१. सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव
२. सर्व मंत्रालयीन विभाग.
३. सर्व आयुक्तालये, संचालनालये
४. सर्व मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्वायत्त संस्था, आयोग, अभिकरणे, कंपन्या. इत्यादी

५. सर्व विभागीय आयुक्त,
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. सर्व आयुक्त महानगरपालिका/सर्व मुख्याधिकारी,
८. सर्व पोलीस आयुक्त/ अधिक्षक,
९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१०. सामान्य प्रशासन विभागातील सेवाविषयक बाबींसबंधित सर्व कार्यासने,
११. निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१२. निवडनस्ती.

# विवरणपत्र-१

## सेवा विषयक आढावा- मंत्रालयीन विभागांचे गुणांकन (एकूण गुण १००)
## टप्पा-१ (कालमर्यादा- दिनांक १ मे, २०२५)

<table>
<tr><th colspan="3">दीर्घकालीन उद्दिष्टे</th></tr>
<tr><td>१)</td><td>आकृतीबंध<br>(गुण १५)</td><td>वित्त विभागाच्या दि.११.०२.२०१६ च्या सूचनांनुसार २०१६ नंतर विभागाच्या अधिनस्त आस्थापनांचा आकृतीबंध सुधारीत करण्यात आला आहे काय?<br><table><tr><th>सद्य:स्थिती</th><th>गुण</th></tr><tr><td>होय</td><td>१५</td></tr><tr><td>नाही</td><td>०</td></tr></table></td></tr>
<tr><td>२)</td><td>सेवाप्रवेश नियम<br>(गुण १५)</td><td>सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९.०९.२०२१ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार एकूण संवर्गापैकी किती संवर्गाचे सेवाप्रवेश नियम अधिसूचित करण्याची कार्यवाही पूर्ण झाली याचे प्रमाण<br>(Unit %) (गुण १५)<br><table><tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr><tr><td>८१-१००</td><td>१५</td></tr><tr><td>६१-८०</td><td>१२</td></tr><tr><td>४१-६०</td><td>९</td></tr><tr><td>२१-४०</td><td>६</td></tr><tr><td>११-२०</td><td>३</td></tr><tr><td>१-१०</td><td>०</td></tr></table></td></tr>
</table>

**टीप:**

- **वित्त विभागाच्या दि.** ११.०२.२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे सर्व विभागांनी दि.३०.०९.२०१६ पर्यंत त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयातील पदांचा आढावा घेऊन आकृतीबंध निश्चित करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सर्व विभागांनी आकृतीबंध निश्चित केल्यावर **सा.प्र.वि., शा. नि. दि.**०९.०९.२०२१ व्दारे विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमांच्या आदर्श नमुन्याच्या आधारे मंजूर पदांचे सेवाप्रवेश नियम आढावा घेऊन सुधारीत करणे अभिप्रेत आहे. जेणेकरुन सुधारीत सेवाप्रवेश नियमानुसार सरळसेवा/ पदोन्नतीने पदभरतीच्या प्रक्रियेस चालना मिळून प्रशासनाचे कामकाज अधिक गतिमान होऊ शकेल.
- सदर आढावा हा प्रत्येक सचिवांच्या स्तरावर घेण्यात येत असल्याने संबंधित सचिवांच्या अखत्यारीतील सर्व आस्थापनांचे **आकृतीबंध अंतिम** झाले असल्यास **पूर्ण गुण आणि नसल्यास शून्य गुण** देण्यात येतील.
- संबंधित सचिवांच्या अखत्यारीतील आस्थापनांच्या **सेवाप्रवेश नियमाच्या सुधारणेच्या प्रमाणानुसार तक्त्यात नमूद केल्यानुसार गुण** देण्यात येतील.
- **सदर माहिती तपासण्याचा स्त्रोत:** शासनाच्या संकेतस्थळावर विभागाने प्रसिध्द केलेला आकृतीबंध व अधिसूचित केलेले सेवाप्रवेश नियम.

<table>
<tr><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3">मध्यम मुदतीची उद्दिष्टे</td></tr>
<tr>
<td>३)</td>
<td>पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती (गुण १५)</td>
<td>
१) सद्यस्थितीतील पदोन्नतीच्या कोट्यातील गट अ व गट ब संवर्गातील एकूण रिक्त पदांचे प्रमाण (Unit %) (गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>१</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>२</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>४</td></tr>
<tr><td>०-२०</td><td>५</td></tr>
</table>
टीप : पदोन्नतीच्या कोट्यात एकूण मंजूर पदांपैकी प्रत्यक्षात रिक्त पदांची टक्केवारी या घटकासाठी ग्राह्य धरण्यात येईल.
</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
२) गट अ व गट ब संवर्गातील किती संवर्गाच्या ज्येष्ठतासूची अद्ययावत करुन प्रसिद्ध केल्या आहेत? (Unit %) (गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>५</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>४</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>२</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>१</td></tr>
</table>
टीप : साप्रवि, शा. नि. दि.०१.०८.२०१९ मधील परिशिष्ट ३ मध्ये विहित केल्यानुसार प्रत्येक वर्षी दि. ३१ मार्च पर्यंत संबंधित संवर्गाची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे आवश्यक आहे.
</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
३) गट अ व गट ब संवर्गापैकी किती संवर्गाच्या निवडसूच्या वेळापत्रकानुसार सादर करण्यात आल्या आहेत? (Unit %) (गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>५</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>४</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>२</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>१</td></tr>
</table>
टीप : साप्रवि, शा. नि. दि.०१.०८.२०१९ मधील परिशिष्ट ३ मध्ये विहित केल्यानुसार प्रत्येक वर्षी दि. ३० नोव्हेंबर पर्यंत संबंधित संवर्गाच्या पदोन्नतीच्या निवडसूच्या अंतिम करुन पदोन्नतीचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.
</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td>४)</td>
<td>सरळसेवा नियुक्तीची स्थिती<br>(गुण १५)</td>
<td>
१) सरळसेवा नियुक्तीमधील गट अ व गट ब संवर्गातील रिक्त पदांचे प्रमाण<br>(Unit %) (गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>१</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>२</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>४</td></tr>
<tr><td>०-२०</td><td>५</td></tr>
</table>
<hr>
२) सरळसेवेच्या रिक्त पदांपैकी गट अ व गट ब संवर्गातील किती पदांचे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे?<br>(Unit %) (गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>५</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>४</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>२</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>१</td></tr>
</table>
टीप :सरळसेवेकरिता पदे उपलब्ध नसल्यामुळे त्या वर्षात मागणी निरंक असल्यामुळे मागणीपत्र पाठविले नसल्यास पूर्ण गुण देण्यात येतील. परंतु पद उपलब्ध असून मागणीपत्र पाठविण्याबाबत कार्यवाही झाली नसल्यास शून्य गुण देण्यात येतील.
<hr>
३) शिफारस प्राप्त झालेल्या गट अ व गट ब संवर्गातील किती पदांवर नियुक्ती देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे<br>(Unit %)(गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>५</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>४</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>२</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>१</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>५)</td>
<td>अनुकंपा नियुक्ती<br>(गुण १०)</td>
<td>
अनुकंपा नियुक्तीसाठी विभागाकडे उपलब्ध पदांवर देण्यात आलेल्या अनुकंपा नियुक्तीचे प्रमाण (Unit %) (गुण १०)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>१०</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>८</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>६</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>४</td></tr>
<tr><td>०-२०</td><td>२</td></tr>
</table>
</td>
</tr>
</table>

<table>
<tr><th colspan="3">३) अल्पकालीन मुदतीची उद्दिष्टे</th></tr>
<tr><td>६)</td><td>गोपनीय अहवाल<br>(गुण १०)</td><td>१) गट-अ, गट-ब संवर्गातील एकूण किती अधिकाऱ्यांचा समावेश महापार प्रणालीत करण्यात आला आहे. (Unit %) (गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>५</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>४</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>२</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>१</td></tr>
</table>
टीप: सदर माहिती तपासण्याचा स्त्रोत: महापार पोर्टल.<br>
२) सन २०२३-२४ यावर्षात आत्तापर्यंत किती अधिकाऱ्यांची MAHAPAR वरील कार्यवाही पूर्ण झालेली आहे. ( Close PAR %) (Unit %) (गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>५</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>४</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>२</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>१</td></tr>
</table>
टीप: सदर माहिती तपासण्याचा स्त्रोत: महापार पोर्टल.</td></tr>
<tr><td>७)</td><td>iGOT पोर्टलवर रजिस्ट्रेशन<br>(गुण १०)</td><td>१) विभागाच्या अधिनस्त शासकीय कर्मचाऱ्यांपैकी किती कर्मचाऱ्यांचे केंद्र शासनाच्या ऑनलाईन प्रशिक्षण प्लॅटफॉर्म iGOT पोर्टलवर रजिस्ट्रेशन करण्यात आले आहे. (Unit %) (गुण १०)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>१०</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>८</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>६</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>४</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>२</td></tr>
</table>
टीप:<br>
• सदर कार्यवाही तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे.<br>
• सदर माहिती तपासण्याचा स्त्रोत: iGOT पोर्टल</td></tr>
<tr><td>८)</td><td>विभागीय चौकशी<br>(गुण १०)</td><td>१) DE पोर्टलवर अद्यावत माहिती अपलोड करणे. (गुण ५)
<table>
<tr><th>सद्य:स्थिती</th><th>गुण</th></tr>
<tr><td>होय</td><td>५</td></tr>
<tr><td>नाही</td><td>०</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | २) एकूण निलंबित कर्मचाऱ्यांपैकी किती कर्मचाऱ्यांच्या प्रकरणात निलंबन आढाव्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे त्याची टक्केवारी(Unit %) (गुण ५) |

| टक्केवारी | गुण |
|---|---|
| ९१-१०० | ५ |
| ६१-९० | ४ |
| ४१-६० | ३ |
| २१-४० | २ |
| ११-२० | १ |

**टीप:** सदर माहिती तपासण्याचा स्त्रोत DE मॉडयूल

# विवरण पत्र -२

## टप्पा-२

## सेवा विषयक आढावा- मंत्रालयीन विभागांचे गुणांकन (एकूण गुण १००)
## (कालमर्यादा- दिनांक १५ ऑगस्ट, २०२५)

**अल्पकालीन मुदतीची उद्दिष्टे**

**१) विभागातील गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड संवर्गातील पदोन्नतीबाबत स्थिती (गुण २०)**

**१) निवडसूची वर्ष २०२४-२५ मध्ये गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड संवर्गात पदोन्नती कोट्यातील पद उपलब्ध असलेल्या संवर्गापैकी किती संवर्गाचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. (Unit %) (गुण २०)**

| टक्केवारी | गुण |
|---|---|
| ९१-१०० | २० |
| ७१-९० | १६ |
| ५१-७० | १२ |
| ३१-५० | ८ |
| ११-३० | ४ |

**टीप** : एखाद्या संवर्गात खालील कारणामुळे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करता येत नसतील तर त्या पदांना उपरोक्त गणना करताना वगळण्यात येईल.

- न्यायालयीन प्रकरणामुळे पदोन्नती देता येत नाही.
- निम्न संवर्गात पात्र उमेदवार उपलब्ध नाहीत.
- पद खुले ठेवण्यात आले असल्यामुळे पदोन्नतीचे पद रिक्त आहे.
- दिव्यांग अधिकारी/कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे त्या प्रवर्गाचे पद रिक्त ठेवण्यात आले आहे.

निवडसूची वर्ष २०२४-२५ करिता उपरोक्त प्रमाणे प्रत्येक विभागाने सामान्य प्रशासन विभागास कळविलेली संवर्गनिहाय पदोन्नतीची दिनांक ३० ऑगस्ट, २०२५ रोजीची स्थिती सामान्य प्रशासन विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**२) गोपनीय अहवाल (गुण २०)**

**१) गट-अ, गट-ब संवर्गातील एकूण किती अधिकाऱ्यांचे मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल digitised करून महापार प्रणालीवर Upload करण्यात आले आहेत (Unit %) (गुण २०)**

| टक्केवारी | गुण |
|---|---|
| ९१-१०० | २० |
| ७१-९० | १६ |
| ५१-७० | १२ |
| ३१-५० | ८ |
| ११-३० | ४ |
| ०-१० | ० |

**टीप:**

- सदर कार्यवाही **दि. ३१ जुलै** पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.
- सदर माहिती तपासण्याचा स्त्रोत: **महापार पोर्टल**

<table>
<tr>
<td>३)</td>
<td>iGOT पोर्टलवरील ५ प्रमाणपत्र कोर्स पूर्ण करणे. (गुण १०)</td>
<td>
कार्यालयातील कर्मचाऱ्यांपैकी किती कर्मचाऱ्यांनी केंद्र शासनाच्या ऑनलाईन प्रशिक्षण प्लॅटफॉर्म iGOT पोर्टलवर ५ कोर्स पूर्ण केले आहेत याचे प्रमाण.<br>
(Unit %) (गुण १०)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>१०</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>८</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>६</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>४</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>२</td></tr>
</table>
टीप:
<ul>
<li>सदर माहिती तपासण्याचा स्त्रोत: iGOT पोर्टल</li>
<li>सदर ५ कोर्स मधील ३ कोर्स सर्वसाधारण तर २ कोर्स विभागांशी संबंधित तांत्रिक विषयाचे असावेत.</li>
</ul>
</td>
</tr>
<tr>
<td>४)</td>
<td>सेवाविषयक बाबींच्या डिजिटल पोर्टलवर सेवापुस्तक अद्ययावत करणे व ऑनबोर्डींग करणे (गुण ५०)<br>E-hrms</td>
<td>
सेवाविषयक बाबींच्या डिजिटल पोर्टलवर किती कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत झाले आहे याची टक्केवारी<br>
(Unit %) (गुण ५०)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>९१-१००</td><td>५०</td></tr>
<tr><td>७१-९०</td><td>४०</td></tr>
<tr><td>५१-७०</td><td>३०</td></tr>
<tr><td>३१-५०</td><td>२०</td></tr>
<tr><td>११-३०</td><td>१०</td></tr>
<tr><td>०-१०</td><td>०</td></tr>
</table>
टीप:
<ul>
<li>सदर कार्यवाही दि.३१ जुलै पर्यंत पूर्ण करावयाची आहे.</li>
<li>माहिती तपासण्याचा स्त्रोत सेवाविषयक डिजिटल पोर्टल</li>
</ul>
</td>
</tr>
</table>

# विवरणपत्र-३

## प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, उपक्रम, आयोग यामध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे गुणांकन (एकूण गुण १००)

## (कालमर्यादा- दिनांक २ ऑक्टोबर, २०२५)

<table>
<tr><th colspan="3">दीर्घकालीन उद्दिष्टे</th></tr>
<tr><td>१</td><td>आकृतीबंध<br>(गुण १०)</td><td>कार्यालयांचा आकृतीबंध सुधारीत करण्यात आला आहे का?
<table>
<tr><th>सद्य:स्थिती</th><th>गुण</th></tr>
<tr><td>होय</td><td>१०</td></tr>
<tr><td>नाही</td><td>०</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>२</td><td>सेवाप्रवेश नियम<br>(गुण १०)</td><td>कार्यालयातील एकूण संवर्गापैकी किती संवर्गाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले आहेत व अद्ययावत करण्याची कार्यवाही पूर्ण झाली याचे प्रमाण (Unit %) (गुण १०)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>१०</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>८</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>६</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>४</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>२</td></tr>
<tr><td>१-१०</td><td>०</td></tr>
</table></td></tr>
<tr><td colspan="3">टीप:<br>• प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिनस्त सर्व कार्यालये जसे क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, उपक्रम, आयोग यांचे आकृतीबंध विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावेत.<br>• प्रत्येक सचिवांनी अधिनस्त संबंधित कार्यालयांचा आकृतीबंध अंतिम झाला असल्यास पूर्ण गुण आणि नसल्यास शून्य गुण देण्याबाबत कार्यवाही करावी.</td></tr>
<tr><th colspan="3">मध्यम मुदतीची उद्दिष्टे</th></tr>
<tr><td>३</td><td>सर्व संवर्गाची अद्ययावत जेष्ठतासूची प्रसिद्ध करणे(१०)</td><td>कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील किती संवर्गाच्या वर्ष २०२४-२५ ची ज्येष्ठतासूची अद्ययावत करुन प्रसिद्ध केल्या आहेत? (Unit %) (गुण १०)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>१०</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>८</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>६</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>४</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>२</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ४ | **पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती (गुण १०)** | **कार्यालयात सद्यस्थितीतील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदांचे प्रमाण (Unit %) (गुण १०)**<br><br>**टक्केवारी** / **गुण**:<br>८१-१०० — २<br>६१-८० — ४<br>४१-६० — ६<br>२१-४० — ८<br>०-२० — १०<br><br>**टीप** : पदोन्नतीच्या कोट्यात एकूण मंजूर पदांपैकी प्रत्यक्षात रिक्त पदांची टक्केवारी या घटकासाठी ग्राह्य धरण्यात येईल. |
| ५ | **सरळसेवा नियुक्ती रिक्त पद स्थिती (गुण १०)** | **कार्यालयात सरळसेवा नियुक्तीमधील रिक्त पदांचे प्रमाण (Unit %) (गुण १०)**<br><br>**टक्केवारी** / **गुण**:<br>८१-१०० — २<br>६१-८० — ४<br>४१-६० — ६<br>२१-४० — ८<br>०-२० — १० |
| ६ | **बिंदू नामावली प्रमाणीकरण (गुण १०)** | **कार्यालयातील एकूण संवर्गापैकी किती संवर्गाच्या बिंदू** नामावली प्रमाणित करून घेतल्या आहेत? **(Unit %) (गुण १०)**<br><br>**टक्केवारी** / **गुण**:<br>८१-१०० — १०<br>६१-८० — ८<br>४१-६० — ६<br>२१-४० — ४<br>११-२० — २ |
| ७ | **अनुकंपा नियुक्ती (गुण १०)** | **कार्यालयास अनुकंपा नियुक्ती लागू असल्यास अनुकंपा नियुक्तीसाठी एकूण उपलब्ध पदांपैकी किती पदांवर नियुक्त्या देण्यात आल्या आहेत त्याचे प्रमाण (Unit %) (गुण १०)**<br><br>**टक्केवारी** / **गुण**:<br>८१-१०० — १०<br>६१-८० — ८<br>४१-६० — ६<br>२१-४० — ४<br>०-२० — २ |

<table>
<tr>
<td>८</td>
<td>iGOT पोर्टलवर रजिस्ट्रेशन व ५ कोर्स पूर्ण करणे.<br>(गुण १०)</td>
<td>
१) कार्यालयातील कर्मचाऱ्यांपैकी किती कर्मचाऱ्यांनी केंद्र शासनाच्या ऑनलाईन प्रशिक्षण प्लॅटफॉर्म iGOT पोर्टलवर रजिस्ट्रेशन केले आहे. (Unit %) (गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>५</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>४</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>२</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>१</td></tr>
</table>
टीप: सदर माहिती तपासण्याचा स्त्रोत: iGOT पोर्टल
<hr>
२) कार्यालयातील कर्मचाऱ्यांपैकी किती कर्मचाऱ्यांनी केंद्र शासनाच्या ऑनलाईन प्रशिक्षण प्लॅटफॉर्म iGOT पोर्टलवर ५ कोर्स पूर्ण केले आहेत त्याचे प्रमाण.<br>(Unit %) (गुण ५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>८१-१००</td><td>५</td></tr>
<tr><td>६१-८०</td><td>४</td></tr>
<tr><td>४१-६०</td><td>३</td></tr>
<tr><td>२१-४०</td><td>२</td></tr>
<tr><td>११-२०</td><td>१</td></tr>
</table>
टीप:
<ul>
<li>सदर माहिती तपासण्याचा स्त्रोत: iGOT पोर्टल</li>
<li>सदर ५ कोर्स मधील ३ कोर्स सर्वसाधारण तर २ कोर्स विभागांशी संबंधित तांत्रिक विषयाचे असावेत.</li>
</ul>
</td>
</tr>
<tr>
<td>९</td>
<td>सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करणे व डिजिटल करणे.<br>(गुण २०)</td>
<td>
कार्यालयातील एकूण किती कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अद्ययावत करून डिजिटल करण्यात आली आहेत याची टक्केवारी (Unit %) (गुण २०)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>९१-१००</td><td>२०</td></tr>
<tr><td>७१-९०</td><td>१६</td></tr>
<tr><td>५१-७०</td><td>१२</td></tr>
<tr><td>३१-५०</td><td>८</td></tr>
<tr><td>११-३०</td><td>४</td></tr>
<tr><td>०-१०</td><td>०</td></tr>
</table>
</td>
</tr>
</table>